# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६**

## अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - ५

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एम-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०८, अन्न साठवण व वखार**<br>**बाब क्रमांक: ९१, रूपये:- ५५,५२,६९,०००/-**<br>**श्री. उत्तमराव जानकर** |
| (१) | १०७७ | १० | सोलापूर जिल्ह्यात व माळशिरस तालुक्यात कष्टकरी, विडी कामगार, मजुर यांची संख्या जास्त असूनही सोलापूर जिल्ह्यात १६ शिवभोजन केंद्र सुरू असून याची गेल्या काही महिन्यांपासून अनुदान प्रलंबित आहे, तसेच सोलापूर जिल्ह्यासह माळशिरस तालुक्यात नव्याने शिवभोजन केंद्र सुरू करण्यासाठी शासनाकडून तात्काळ मंजूरी देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (२) | १०३३ | १० | सोलापूर जिल्ह्यात कष्टकरी, विडी कामगार, मजुर यांची संख्या जास्त असूनही सोलापूर जिल्ह्यात १६ शिवभोजन केंद्र सुरू असून याची गेल्या ४ महिन्यांपासून अनुदान प्रलंबित आहे, तसेच सोलापूर जिल्ह्यासह सांगोला तालुक्यात नव्याने शिवभोजन केंद्र सुरू करण्यासाठी शासनाकडून तात्काळ मंजूरी देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (३) | १०४९ | १० | राज्य शासनाने शिवभोजन थाळी योजनेतंर्गत सुमारे २०० कोटी रुपयांचे अनुदान थकित ठेवल्याने, राज्यातील १८०० केंद्र चालकावर अर्थिक संकट कोसळणे, सदरहू योजनेतंर्गत दुर्बल व गरीब लोकांना भोजन पुरविण्यात येत असणे, नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागण्याद्वारे रुपये १९७.९१ कोटी शिवभोजन योजनेसाठी मंजूर करुनही, सदरहू मंजूर निधी अद्याप शासनाने केंद्र चालकांना वितरीत करण्यात न येणे, शासनाकडून अनुदान मिळत नसल्याने, उधारीवर किराणा माल आणून शिवभोजन केंद्र चालविण्यात येत असणे, शासनाकडून अनुदान न मिळाल्याने सावकाराकडून १० टक्के व्याजाने कर्ज घेऊन केंद्र चालविण्यात येत असणे, परंतू अद्यापही शासनाकडून निधी न मिळाल्याने अनेक शिवभोजन केंद्रे बंद पडण्याच्या मार्गावर असणे, राज्यातील आर्थिक संकटात सापडलेल्या शिवभोजन केंद्राना थकीत रुपये २०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अनिल मांगुळकर** |
| (४) | १०३५ | १० | यवतमाळ जिल्हयातील अनेक बचत गटामार्फत चालविण्यात येणा-या शिवभोजन योजनेचा निधी प्रलंबित असल्याने बचत गटांना ही योजना राबविणे अत्यंत कठीण जात असल्याने यासाठी त्वरीत निधी उपलब्ध करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (५) | १०७२ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण राज्यामध्ये राबविण्यात आलेली शिवभोजन थाळी योजना ही सर्वसामान्य, कष्टकरी, मजूर व गरजू नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना होती. अल्प दरात पौष्टिक भोजन उपलब्ध करून देणारी ही योजना राज्यातील लाखो नागरिकांसाठी दिलासा देणारी ठरली होती. मात्र, सद्यस्थितीत ही योजना प्रत्यक्षात बंद अवस्थेत असून अनेक केंद्र चालक व संबंधित दुकानदारांचे शासनाकडील देयके मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत. त्यामुळे संबंधित व्यावसायिकांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. शासनाकडून वेळेत अनुदान व अनुदानाची रक्कम न मिळाल्यामुळे अनेक केंद्रे बंद पडली आहेत. तरी शासनाकडे माझी मागणी आहे की मुंबईसह संपूर्ण राज्यातील शिवभोजन केंद्रांचे प्रलंबित देयक तात्काळ अदा करण्यात यावे. योजना नियमितपणे पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद चालू अर्थसंकल्प/पुरवणी मागणीत करण्यात यावी. केंद्र चालकांना अनुदान वितरणासाठी पारदर्शक व वेळबद्ध यंत्रणा तयार करण्यात यावी. योजना पूर्ववत प्रभावीपणे राबविण्याबाबत स्पष्ट शासन निर्णय जाहीर करण्यात यावा. गरजू व कष्टकरी जनतेच्या हितासाठी तसेच केंद्र चालकांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२६**

**डॉ.विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.